


सायं. दैनिक

# सार्व मंथन

नवी दिशा, नवी आशा

मुख्य संपादक : अनिल कोळसे, मो. ९८२२५४४०७२

इंटरनेट आवृत्ती : गुगल वर पहा
www.sarvmanthan.in

। अहिल्यानगर । वर्ष ५ वे । अंक १२७ वा । शुक्रवार, ०५ डिसेंबर २०२५ । पाने ४ । किंमत ३ रुपये । RNI No. MAH/MAR/2016/72596 । sarvmanthan16@gmail.com ।

## ठरलं! मतमोजणी २१ डिसेंबरलाच

सार्व मंथन नवी दिल्ली ०५ । नागपूर खंडपीठाने दिलेल्या आदेशानुसार मतमोजणी पुढे ढकलण्यात आली होती. या आदेशाला आव्हान देत सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल झाली होती. मुख्य न्यायाधीश सूर्य कांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठापुढे प्रकरणी सुनावणी पार पडली.सुनावणीनंतर सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाचा निर्णय कायम ठेवत मतमोजणी थेट २१ डिसेंबरलाच करण्याचे आदेश निवडणूक आयोगाला दिले आहेत. त्यामुळे मतदारांचे लक्ष आता आगामी मतमोजणीकडे लागले असून अनेक शहरांतील सत्तांतराविषयीची उत्सुकता वाढली आहे.

# सरकारविरोधात शिक्षकांचा एल्गार

## बंदमुळे ८० हजार शाळांना कुलूप; सर्व संघटना एकाच झेंड्याखाली



- जिल्हा परिषद तसेच खाजगी शाळेतील शिक्षकांकडून आज काम बंद आंदोलन
- सुप्रीम कोर्टाने शिक्षकांना टीईटी सक्तीची असल्याचा निर्णय दिलाय
- त्यावर राज्य सरकारने सुप्रीम कोर्टात पुनर्विचार याचिका दाखल करावी
- तसेच केंद्र सरकारच्या एनसीटीईच्या निकषात बदल करावेत
- रजा विनापगारी ग्राह्य धरण्यात येणार असल्याचे आदेश शिक्षण संचालकांनी दिले
- शिक्षकांनी शाळेत येणे टाळले आहे, त्यामुळे शाळेच्या परिसरात शुकशुकाट

**सार्व मंथन**
**मुंबई ०५ । वृत्तसंस्था**

आज ५ डिसेंबर रोजी राज्यातील तब्बल ८० हजार शाळा बंद आहेत. शिक्षक संघटनांनी शाळा बंदची हाक दिली होती. सरकार आणि शिक्षक संघटनांमध्ये कोणताही तोडगा न निघाल्याने शिक्षकांनी आंदोलनाचा पवित्रा कायम ठेवला आहे.

विरोधी आणि सत्ताधारी पक्षांतील शिक्षक आमदारांनी या आंदोलनाला पाठिंबा दिला आहे. यामुळे प्रशासन आणि शिक्षक संघटनांमधील संघर्ष वाढला आहे. गेल्यावर्षीचे, २०२४ मधील संच मान्यता धोरण रद्द करा आणि टीईटी परीक्षेमुळे वाढलेला संभ्रम दूर करा या शिक्षक संघटनांच्या प्रमुख मागण्या आहेत. यावर योग्य तोडगा न निघाल्याने राज्यातील सर्व शासकीय आणि खासगी अनुदानीत ८० हजार शाळा बंद ठेवण्याचे आवाहन शिक्षक संघटनांनी केले आहे.राज्यात आज शिक्षक संघटना शिक्षण विभागाच्या विभागीय कार्यालयात निवेदन देणार आहेत. संच मान्यता धोरणानुसार राज्यातील हजारो शाळांमध्ये केवळ एक अथवा दोनच शिक्षक नियुक्त होतील. विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होईल असा दावा शिक्षक संघटनांनी केला आहे. बंदमध्ये सहभागी झाल्यास एक दिवसाचे वेतन कपातीचा आदेश माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी दिला होता. पण शिक्षकांवर त्याचा काहीही परिणाम झाला नाही. शिक्षक आंदोलनावर ठाम आहेत. यामुळे मोठा पेच निर्माण झाला आहे.शासनाच्या आदेशानंतरही शिक्षक संघटना आजच्या आंदोलनावरठामराहिल्या.वेतन कपातीची ही भीती सरकारने घातली. पण त्याला संघटना बधल्या नाहीत. आजच्या आंदोलनात सर्व प्राथमिक, माध्यमिक, शिक्षकेत्तर संघटना, संस्थाचालक, शिक्षण सेवक आणि मुख्याध्यापक संघटना एकत्र आल्या आहेत. तर या संपाला विरोधक आणि सत्ताधारी अशा शिक्षक आमदारांनी पाठिंबा दिला आहे. दोन वर्षांत टीईटी पास न झाल्यास शिक्षकांवर टांगती तलवार तर आहेच पण संच मान्यतेचा प्रश्न ही ऐरणीवर आला आहे. ग्रामीण भागात मराठी शाळा बंद पडत असल्याने अनेक पद आता रिक्तच नाही तर कायमची संपण्याची भीती आहे. तसेच इतरही अनेक प्रश्न आ वासून उभे ठाकले आहे. त्यामुळे यावेळी शिक्षकांनी कोणत्याही दबावाला न जुमानता बंदचा झेंडा उंच केला आहे.

शिक्षकांमध्ये संभ्रम विद्यार्थी आणि पालकाची गैरसोय होऊ नये म्हणून मुंबई भायखळा व आसपासच्या परिसरातील शाळा नियमितपणे सुरू आहे. मधल्या सुट्टीनंतर काही शाळा संपात सहभागी होण्याची शक्यता वर्तवण्यात

पान २ वर



# रशियाचे अध्यक्ष पुतिन भारत दौऱ्यावर

**सार्व मंथन**
**नवी दिल्ली ०५ । वृत्तसंस्था**

भारत आणि अमेरिकेत अनेक वर्षांपासून चांगले संबंध आहेत. मात्र, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर लावलेल्या टॅरिफनंतर दोन्ही देशांमधील संबंध तणावात आहेत. हेच नाही तर ट्रम्प भारताबद्दल धक्कादायक विधाने करतानाही अनेकदा दिसले. रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन भारताच्या दौऱ्यावर आहेत. पुतिन भारतात पोहोचताच अमेरिकेत मोठी खळबळ उडाली. मुळात म्हणजे रशिया आणि भारतातील मैत्री अमेरिकेसाठी मोठी पोटदुखी आहे. कोणत्याही परिस्थितीमध्ये अमेरिकेला भारत आणि रशियातील व्यापार बंद करायचा आहे. पुतिन हे अचानक भारत दौऱ्यावर पोहोचल्याने अमेरिकेला मोठा धक्का बसला. काही दिवसांपूर्वीच पुतिन आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट चीनमध्ये झाली होती. त्यामध्येच आता अमेरिकन सैन्य धोक्यात आले आहे.

अमेरिकेचे

पान २ वर

## राहुरीतील स्थगित प्रभाग २-अ मधिल निवडणुकीला वेग

सविस्तर वृत्त पान ४ वर

### बोधीसत्व

महा मानव लाडके
खरोखरी बोधीसत्व
तंतोतंत आचरणात
बुध्दधर्मांची ती तत्व

आजकळे विचारांत
भरलेले जीवनसत्व
आपल्यात नसतानां
जाणते अपार महत्व

चरित्र गाथा सांगता
दगडापाझरे कवित्व
सक्षम संविधानाला
लाभले तव पितृत्व

हृदयी थेट पोचायचे
अभ्यासपूर्ण वक्तृत्व
संग्रहात राहो भाषणे
अजूनि अपूर्व महत्त्व

इतिहास गाई गोडवे
विरळा हे व्यक्तीमत्व
जाती पाती पलीकडे
निळ्या सूर्याचे कर्तृत्व

हक्क कर्तव्य सांगड
कळले घेण्या दायित्व
आंदोलन असे करा
शिकवी सार्थ नेतृत्व

भरभरून देई सकला
असे ना कुठे दातृत्व
महानिर्वाण होई जरी
जाणे अजून अस्तित्व

- हेमंत मुसरीफ, पुणे
९७३०३०६९९६

# राहुरी निवडणुकीत मतांची लढाई संपली आता द्वेष नाही

## नात्यांची जपणूक करा! नेत्यांच्या सत्तासंग्रामात कार्यकर्त्यांची जिरवा-जिरवी थांबवलीच पाहिजे!

**सार्व मंथन**
**राहुरी ०५ । विशेष प्रतिनिधी**




राहुरी नगरपरिषदेची निवडणूक पार पडली गल्ली-बोळांपासून सोशल मीडियापर्यंत तापलेले वातावरण आता शांत होत असले तरी मनातील राजकीय जखमा भरायला वेळ लागणार हेही तितकंच खरे आहे. नगराध्यक्ष पदासाठी तब्बल पाच उमेदवार रिंगणात उतरले होते तर १२ प्रभागातून तब्बल ९० उमेदवारांनी नगरसेवक पदासाठी झुंज दिली. सत्तेची ही धावपळ, आरोप-प्रत्यारोपांची धुरळण आणि कार्यकर्त्यांची धावपळया साऱ्यात लोकशाहीचा उत्सव रंगला होता.

राहुरी शहरातील मतदारसंख्या ३३,२७० होती. त्यापैकी २४,१०९ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. पुरुष मतदार १२,३०१ तर महिला मतदार ११,८०८ इतक्या संख्येने मतदानासाठी पुढे आल्या. किरकोळ वाद-विवाद सोडले तर संपूर्ण निवडणूक शांततेत पार पडली, ही दिलासादायक बाब. परंतु मतदानाचा दिवस संपला म्हणून राजकारण संपले का? नाही! आता खरी गरज आहेमनातील कटुता बाजूला ठेवण्याची गेल्या काही दिवसांत प्रचाराच्या तापलेल्या वातावरणात उमेदवारांनी, कार्यकर्त्यांनी, मित्रांनी, अगदी कुटुंबियांनीही एकमेकांवर शब्दांचे बाण झाडले. काही ठिकाणी मनोमीलन तुटले, तर काही ठिकाणी संबंधांसकट संवादच बंद झाला. आता हे चित्र बदलायला हवं! कारण निवडणूक येते-जाते, मात्र नाती ही आयुष्यभर जपायची असतात.

राजकीय नेत्यांनी सर्वप्रथम कार्यकर्त्यांना भिडवणे, जिरवा जिरवी करणे थांबवले पाहिजे. कारण नेता बदलतो, पदं बदलतात, सत्ता बदलते पण कार्यकर्ताच मात्र सर्वांत जास्त भरडला जातो. वर-वर विरोध असतो, पण आतून नेत्यांचे संबंध चांगलेच असतात; तरीही संघर्षाचा पूर्ण भार कार्यकर्त्यांच्या खांद्यावरच येतो. आता निवडणूक झाली.

आता मतमोजणी २१ डिसेंबरला होणार आहे. पण त्या आधीच राहुरीत मैत्री, बंधुभाव आणि परस्पर सन्मानाची नवी हवा वाहायला हवी. प्रत्येक उमेदवाराने जिंकला किंवा हरला तरी आपले जुने नवे संबंध जपणे गरजेचे आहे.

> **द्वेष नव्हे, संवाद हवा... कटूता नव्हे, आदर हवा...**
> मतभेद असू शकतात, पण मनभेद नकोत! कारण शेवटी राहुरी ही आपलीच आहे आणि राहुरीच्या लोकशाहीचा खरा अर्थ फक्त मतदानात नाही, तर निवडणुकीनंतरही आपलं नाते आबाधित राहील, हे राहुरीकरांनी समजून घेणे गरजेचे आहे.

# तलाठ्यांच्या सही, स्टॅम्पची झंझट संपली!

## फक्त १५ रुपयांत मिळणार ७/१२ उतारा



**सार्व मंथन**
**मुंबई ०५ । वृत्तसंस्था**

महाराष्ट्राच्या महसूल विभागात डिजिटल क्रांतीचा महत्त्वपूर्ण टप्पा पार पडला आहे. डिजिटल ७/१२ उताऱ्याला अखेर राज्य सरकारने कायदेशीर मान्यता दिली असून हा निर्णय जाहीर होताच नागरिकांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळत आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना आदेश काढत डिजिटल सातबारा, ८-अ आणि फेरफार उतारे आता पूर्णपणे वैध मानण्याचे निर्देश दिले आहेत. यासाठी राज्य सरकारने अधिकृत परिपत्रकही जारी केले असून या निर्णयामुळे कोट्यवधी शेतकरी व नागरिकांच्या दैनंदिन कामकाजाला मोठा दिलासा मिळणार आहे.

नवीन नियमांनुसार, नागरिकांना आता केवळ १५ रुपयांचे शुल्क भरून महाभूमी पोर्टलवरून अधिकृत डिजिटल ७/१२ उतारा मिळू शकणार आहे. विशेष म्हणजे या डिजिटल उताऱ्यावर तलाठ्याची स्वाक्षरी किंवा शिक्क्याची आवश्यकता राहणार नाही. डिजिटल स्वाक्षरी, क्यूआर कोड आणि १६ अंकी पडताळणी क्रमांकामुळे हे उतारे स्वतःच कायदेशीरदृष्ट्या वैध ठरणार असून सर्व सरकारी, निमसरकारी, बँकिंग व न्यायालयीन व्यवहारात ते अधिकृत मानले जाणार आहेत.

या नव्या परिपत्रकामुळे या सर्व अडचणींवर पूर्णविराम लागला आहे. महसूल मंत्री बावनकुळे यांनी गेल्या एका वर्षात महसूल विभागातील अनेक प्रलंबित प्रश्न मार्गी लावल्याने त्यांची कार्यशैली राज्यभर चर्चेत आहे.

## शनिशिंगणापूर देवस्थानचे

# दोन कर्मचारी अटकेत

**सार्व मंथन**
**अहिल्यानगर ०५ । प्रतिनिधी**

राज्यभर चर्चेत असलेला आणि विधिमंडळाच्या मागील अधिवेशनातही गाजलेला शनिशिंगणापूर देवस्थानच्या अॅप घोटाळ्याप्रकरणी अखेर सायबर पोलिसांनी कारवाई करत देवस्थानच्या दोघा कर्मचार्यांना गुरूवारी (४ डिसेंबर) रात्री अटक केली. त्यांना आज (शुक्रवार) न्यायालयासमोर हजर केले जाणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. सचिन शेटे, संजय पवार अशी अटक केलेल्या संशयित आरोपींची नावे आहेत. अॅप घोटाळ्याप्रकरणी शनिशिंगणापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर तो तपासासाठी येथील सायबर पोलिसांकडे वर्ग करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सागर ढिकले या गुन्ह्याचा तपास करत आहेत. देवस्थानच्या अधिकृत परवानगीतील तीन अॅप व्यतिरिक्त आणखी चार बेकायदेशीर अॅप आढळून आले आहेत. या माध्यमातून जमा झालेल्या देणग्यांपैकी काही निधी दोघा कर्मचार्यांच्या वैयक्तिक बँक खात्यात वळवला गेल्याचे पोलीस तपासात उघड झाले आहे. पोलिसांनी देवस्थान विश्वस्त, कर्मचारी व पुजार्यांची चौकशी केली आहे. संशयास्पद व्यवहार झालेली बँक खाती तपासली असून अॅपच्या माध्यमातून पैशांची आवक-जावक कशी झाली, कोणाकडे निधी

पान २ वर

# राहुरीत बिबट्याचे अनेकांना दर्शन

## तिळेश्वरनगर-माळी गल्ली परिसरात दहशत, वनविभाग अलर्ट

**सार्व मंथन**
**राहुरी ०५ । विशेष प्रतिनिधी**



राहुरी शहरातील तिळेश्वर नगर-माळी गल्ली परिसरात बिबट्याचा वावर वाढल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. नागरी वस्तीच्या भागातच फिरणाऱ्या या वन्यप्राण्यामुळे रहिवासी अक्षरशः थरथर कापू लागले असून, नागरिकांनी स्वतःच्या सुरक्षेसाठी घरासमोर स्फोटक फटाके फोडत बिबट्याला पळवून लावण्याचा प्रयत्न केला.

दरम्यान, परिस्थितीची गंभीर दखल घेत वनविभागाचे पथके तातडीने येथे दाखल झाले. वन क्षेत्रपाल दत्तात्रय साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली वनरक्षक बाळासाहेब आटोळे, हरीश मुंडे, ज्ञानेश्वर कडनर, ताराचंद गायकवाड, शशिकांत मोरे यांनी परिसरात सर्च ऑपरेशन राबवले. बॅटरीच्या उजेडात बराच वेळ शोधमोहीम सुरु ठेवली, मात्र बिबट्या नजरेस पडला नाही.

वनविभागाने आज या ठिकाणी पिंजरा बसविण्यात येणार असल्याची माहिती दिली आहे. दरम्यान, बिबटे सतत जंगल सोडून लोकवस्तीमध्ये दाखल होत असल्याने नागरिक भयभीत आहेत. पहाटे व रात्री शेतात जाणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये तसेच मजुरीसाठी जाणाऱ्या कामगारांमध्ये बिबट्याविषयी दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. स्थानिकांच्या सुरक्षेसाठी प्रशासन आणि वनविभागाने तातडीने ठोस उपाययोजना करण्याची मागणी जोर धरत आहे.

> **'त्या' लावलेल्या पिंजऱ्याला बिबट्या देतोय हुलकवणी**
> गेल्या तीन आठवड्यापासून तिळेश्वर मंदिर परिसरातील सांगळे वस्ती येथे बंदिस्त शेळ्यांचा गोठा असुन बिबट्या या ठिकाणी घिरट्या घालत असुन वन विभागाने पिंजरा लावला आहे. मात्र या पिंजऱ्यात शिकार न ठेवल्या कारणाने बिबट्या या पिंजऱ्याला हुलकावणी देत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.





## संपादकीय...

मो. ९८२२५४४०७२

# न्याय म्हणावा का?

लोकशाही व्यवस्थेमध्ये संसद सर्वोच्च आहे. कायदेमंडळाकडून कायदा बनविण्याची जबाबदारी सरकारची असते. मंत्रालयात जितके विभाग आहेत त्या अंतर्गत येणाऱ्या सर्व विभागांबाबत निर्णय घेतले जातात. सर्वच कायदे समाजहिताचे असतात असे नव्हे. अनेक कायद्यांमध्ये त्रुटी असतात, त्यामुळे समाजातील काही घटकांवर, तसेच कर्मचाऱ्यांवर अन्याय होतो. कायद्यातील त्रुटी सरकारच्या निदर्शनास आणून देण्याकरिता अनेकदा संप, मोर्चे, आंदोलने इत्यादी मार्गांचा वापरही केल्या जातो. त्याकडे मायबाप सरकार दुर्लक्ष करीत असल्याने शेवटी न्यायालयाचा दरवाजा ठोठावल्या जातो. न्यायालयाचे काही निर्णय सर्वसमावेशक असल्याने केंद्र व राज्यसरकारे त्याबाबत धोरणात्मक निर्णय घेतात. मात्र, अनेक प्रकरणांमध्ये सर्वसमावेशक धोरण न ठरविल्याने व्यक्तीनिहाय याचिका दाखल होतात. मग न्यायालयीन लढा सुरू होतो.न्यायालयातील खटल्यांची संख्या वाढत आहे त्याची जी अनेक कारणे आहेत, त्यापैकी एक कारण म्हणजे एका विभागातील कर्मचाऱ्याबाबत न्यायालयाने निकाल दिल्यानंतर त्या याचिकेचा आधार घेऊन दुसरे, तिसरे, त्यानंतर चौथे कर्मचारी न्यायालयात जातात. न्यायालयाचा निकाल येत राहतो. उच्च आणि सर्वोच्च न्यायालय हे अभिलेख न्यायालय असल्याने एकसारख्या खटल्यांमध्ये एकसारखे निकाल येत राहतात. असे काही निकाल आल्यानंतर त्या विषयांबाबत सरकारने निर्णय घेणे अपेक्षित असते. मात्र, सरकार त्याबाबत कोणताही निर्णय घेत नाही. सरकारी कार्यालयांमध्ये एखादे काम करून घ्यावयाचे असेल, तर त्याबाबत एक तर शासन निर्णय असावा किंवा न्यायालयाचा निर्णय असावा. या दोनपैकी एक असेल, तरचा ती कामे कार्यालयांमध्ये केली जातात. विषयांमध्ये कितीही साम्य असले तरीही न्यायालयाचा निर्णय हा याचिकाकर्त्यांपुरता मर्यादित असतो. त्याच विषयाबाबत दुसऱ्यावर अन्याय झाला असला, तरीही त्याला तो लागू होत नाही, कारण त्यांच्याबाबत न्यायालयाने निर्णय दिलेला नसतो. मग अशा परिस्थितीत त्यांच्यासमोर न्यायालयात जाण्याशिवाय पर्याय नसतो. कर्मचारी सेवानिवृत्त होतात, तरी अनेक प्रकरणांमध्ये न्यायालयाचे निकाल येत नाहीत, न्यायालयातील खटल्यांची संख्या वाढत असल्याने अतिमहत्त्वाचे खटले प्राधान्याने काढले जातात आणि जे खटले महत्त्वाचे वाटत नाहीत ते वर्षानुवर्षे तारीख पे तारीखमध्ये अडकतात. उदाहरणादाखल जुन्या पेन्शन योजनेची चर्चा येथे करता येते. २००५ पूर्वी सेवेत असलेल्यांना जुनी पेन्शन योजना आहे, तर त्यानंतर सेवेत आलेल्यांना नवीन अंशदायी पेन्शन योजना लागू केली. २००५ पूर्वी सेवक म्हणून लागलेले कर्मचारी भरतीकरिता जाहिरात निघालेली पदे, अर्धवेळ पदे अशा काही पदांबाबत नवीन पेन्शन योजना असावी, अशी सरकारची भूमिका आहे. मात्र, जे कर्मचारी न्यायालयात गेले त्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यात आली. २००५ पूर्वी विहित निवड समितीमार्फत अर्थवेळ पदांवर नियुक्त झालेल्या सर्वच विभागांतील कर्मचाऱ्यांना सरकारी कार्यालये पेन्शन नाकारतात. मात्र, जे कर्मचारी न्यायालयात गेले आणि न्यायालयाने त्यांच्या बाजूने निकाल दिला, अशाच कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यात आली. जे अर्धवेळ कर्मचारी न्यायालयात गेले नाहीत त्यांना अद्यापही जुनी पेन्शन योजना लागू केल्या जात नाही, कारण सरकारी बाबू म्हणतात त्याबाबत कायद्यात तरतुदी नाहीत. विविध विभागांतील अशा कर्मचाऱ्यांबाबत मुंबई उच्च न्यायालयासह औरंगाबाद व नागपूर खंडपीठाने निकाल दिले असताना सरकार मात्र झोपेचे सोंग घेत आहे. म्हणूनच उच्च किंवा सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर सरकारने सर्वसमावेशक निर्णय न घेतल्याने न्यायालयातील खटल्यांची संख्या वाढली. राजकीय खटल्यांची संख्या तर भरपूर प्रमाणात वाढली. ३० ते ४० वर्षांपर्यंत न्यायालयात खटले चालतात आणि व्यक्तीच्या मृत्यूनंतर निकाल येतात. या अशा प्रक्रियेला न्याय म्हणावे का?एखाद्या प्रकरणातील खटल्यामध्ये न्यायालयाचा निकाल आल्यानंतर त्या संबंधित प्रकरणातील सर्वांना तो नियम लागू करण्याची जबाबदारी सरकारची असते. जेणेकरून त्या विभागातील सर्वांना न्याय मिळेल. मात्र, सरकारे तसे करीत नसल्याने समानतेच्या तत्त्वाला ठेच पोहोचते. न्यायालयात गेलेल्यांना जुनी पेन्शन योजना, तर न्यायालयात न गेलेल्यांना नवीन पेन्शन योजना ही असमानता नाही का भारतीय संविधानातील मार्गदर्शक तत्त्वांमध्ये समान कामासाठी समान वेतन, अशी तरतूद असल्याने त्या संबंधित सर्वांना नियमावली सुद्धा समान असणे आवश्यक आहे. मात्र, सरकार त्याकडे डोळेझाक करते. अनेकदा सरकार न्यायालयाचा निर्णय लागू करीत नसल्याने न्यायालयाचा अवमान होतो. मग पुन्हा संबंधित याचिकाकर्त्याला न्यायालयीन प्रक्रिया सुरू करावी लागते.सरकारी कायद्यात असलेल्या तरतुदींबाबत किंवा नसलेल्या बाबी अन्यायकारक असल्याने न्यायालये निकाल देतात. न्यायालयाच्या निकालानंतर सरकार धोरणात्मक निर्णय घेत नसल्याने न्यायालयात न गेलेल्या इतरांना मानसिक त्रास सहन करावा लागतो. कर्मचाऱ्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या परिवारालाही संघर्ष करावा लागल्याची उदाहरणे आहेत. म्हणूनच एखाद्या प्रकरणात उच्च किंवा सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिल्यानंतर त्याबाबत सरकारने ताबडतोब कायदा करणे बंधनकारक करावे.

### ‘दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा’च्या जयघोषात

# देवगड येथे भगवान दत्तात्रयांचा जन्मसोहळा

**सार्व मंथन**
नेवासा ०५ । प्रतिनिधी

नेवासा तालुक्यातील गुरुदेव दत्तपीठ, श्री क्षेत्र देवगड येथे गुरुवारी सायंकाळी भगवान दत्तात्रयांचा जन्मसोहळा भक्तिमय वातावरणात साजरा झाला. शंखनिनाद, पुष्पवृष्टी व ‘दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा’ या जयघोषात हा सोहळा पार पडला. दत्तजयंतीनिमित्त लाखो भाविकांनी देवगड येथे हजेरी लावली.

जन्मसोहळ्याप्रसंगी भगवान दत्तात्रयांच्या मूर्तीचे विधिवत पूजन करण्यात आले. फुलांनी सजविलेल्या पाळण्यात ठेवलेल्या मूर्तीसमोर वेदमंत्रोच्चार व पुष्पवृष्टी करण्यात आली. स्वामी पंडितराज मिश्रा (प्रयागराज) यांच्यासह संत-महंतांच्या हस्ते पाळण्याचा सोहळा पार पडला. नेवासा येथील सौ. माधुरीताई कुलकर्णी यांनी दत्तजन्माचा पाळणा सादर केला.

प्रवचनात बोलताना महंतांनी भगवान दत्तात्रयांचे त्रिरूप, धर्मपालन, तपश्चर्या व सत्कर्माचे महत्त्व स्पष्ट केले, तसेच धार्मिक कार्यात सातत्य राखण्याचे आवाहन केले.

या जन्मोत्सव सोहळ्यास स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज, महंत कैलासगिरी महाराज, महंत रमेशानंदगिरी महाराज, महंत आवेराज महाराज, मीराबाई मते, जनार्दन महाराज मेटे, शालिनीताई विखे, आ. विठ्ठलराव लंघे, माजी आ. पांडुरंग अभंग, बाळासाहेब मुरकुटे, काशिनाथ अण्णा नवले, अप्पा बारगजे, पोलीस निरीक्षक महेश पाटील, भाऊ नांगरे यांच्यासह हजारो भाविक उपस्थित होते.





दत्तजयंतीनिमित्त पहाटे भगवान दत्तात्रय व श्री समर्थ सद्गुरू किसनगिरी बाबांच्या मूर्तींचा अभिषेक करण्यात आला. सकाळी पालखी प्रदक्षिणा, दुपारी श्री दत्त यागाची सांगता व प्रवरा नदीतीरी अवधूत स्नान विधी पार पडले.

दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. मंदिर प्रांगणात महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. तसेच आरोग्य तपासणी शिबीर, विविध स्टॉल व चोख बंदोबस्त ठेवण्यात आला. देवगड भक्त परिवाराच्या सेवेकऱ्यांनी सेवाभावातून मोलाची भूमिका बजावली.

# बकू पिंपळगावमध्ये कृषिदुतांचे स्वागत

## शेतकऱ्यांशी संवाद साधत आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा होणार प्रसार

**सार्व मंथन**
नेवासा ०५ । प्रतिनिधी

तालुक्यातील प्रगतीशील गाव म्हणून ओळख असलेल्या बकु-पिंपळगाव येथे शेती क्षेत्रातील अद्ययावत तंत्रज्ञान व शाश्वत शेती पद्धतींचा प्रसार करण्याच्या उद्देशाने पाच कृषीदूतांचे आगमन झाले आहे. या उपक्रमांतर्गत गावातील शेतकऱ्यांशी थेट संवाद साधून शेतीविषयक ज्ञान पोहोचविले जाणार आहे.

ग्रामपंचायत बकु-पिंपळगाव यांच्या वतीने सरपंच सौ. सुनिता बापु लांडगे व उपसरपंच अरुण त्रिंबक हंडाळ यांच्या मार्गदर्शनाखाली कृषीदूतांचे औपचारिक स्वागत करण्यात आले. या प्रसंगी ग्रामविकास अधिकारी आर. आर. घोगरे व तलाठी अमोल केळगेंद्रे यांनी गावाची सामाजिक, आर्थिक व कृषी परिस्थिती यांचा सविस्तर आढावा सादर करून कृषीदूतांना त्यांच्या कार्यासाठी योग्य मार्गदर्शन केले. या रावे कार्यक्रमाअंतर्गत शेतीसंबंधी विविध उपक्रम राबविले जाणार असून, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश तुरबतमट, कार्यक्रम समन्वयक प्रा. मनोज





माने, कार्यक्रम अधिकारी प्रा. संदीप सोनवणे तसेच इतर तज्ज्ञांचे मार्गदर्शन कृषीदूतांना लाभणार आहे, अशी माहिती कृषीदूत संकेत सुरेश म्हसे यांनी दिली.

या उपक्रमात सहभागी झालेल्या कृषीदूतांमध्ये संकेत म्हसे, किरण पुरी, सुमित केसकर, विशाल राजदेव व आविष्कार विटनोर यांचा समावेश आहे. हे विद्यार्थी पुढील काही दिवसांत गावातील शेती व्यवस्था, पीक पद्धती, नैसर्गिक संसाधनांचे व्यवस्थापन यावर सखोल अभ्यास करणार आहेत. प्रत्यक्ष शेतात जाऊन सर्वेक्षण करत शेतकऱ्यांच्या अडचणी, जीवनमान, सामाजिक-आर्थिक स्थिती, साक्षरतेचे प्रमाण तसेच कृषी पद्धतींचा अभ्यास केला जाणार आहे. तसेच शेतकऱ्यांना माती व पाणी परीक्षण, पिकांवरील रोग-किड व्यवस्थापन, खत व्यवस्थापन, जैविक शेती तसेच विविध शासकीय योजनांची सविस्तर माहिती कृषीदूतांकडून देण्यात येणार आहे.

या उपक्रमास ग्रामपंचायत सदस्य मोनिका मते, सविता जांभळकर सुशिला पातारे, बापु माळी व सोमनाथ वरकड यांनी सक्रिय पाठिंबा दर्शवित कृषीदूतांना सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. संगणक परिचालक अक्षय पांढरे हे तांत्रिक सहकार्य करत आहेत. या उपक्रमामुळे बकु पिंपळगावमधील शेतकऱ्यांना आधुनिक शेतीची दिशा मिळून शेती अधिक शाश्वत व लाभदायक ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# सोनईमध्ये ४७ रक्तदात्यांनी केले रक्तदान



**सार्व मंथन**
सोनई ०५ । प्रतिनिधी

सोनई येथील पशु सेवादाता संघटना,गोल्डन मेमेरी ग्रुप व मुळा एज्युकेशन सोसायटी सोनई यांच्या वतीने जागतिक एड्स दिन व सामाजिक कार्यकर्ते स्व. नितीन प्रभाकर दरंदले यांच्या चतुर्थ पुण्यस्मरण दिनानिमित्त घेण्यात आलेल्या रक्तदान शिबीरात ४७ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

दि.२ डिसेंबर रोजी सकाळी दहा वाजता सोनई येथील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात जिल्हा परिषदेचे माजी सभापती सुनिल गडाख यांच्या हस्ते रक्तदान शिबिराचा शुभारंभ करण्यात आले. या कार्यक्रमास सोनईचे सरपंच धनंजय वाघ, मुळा संस्थेचे सहसचिव डॉ.विनायक देशमुख, कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हरी मोरे, उदय पालवे, डॉ. ज्ञानेश्वर दरंदले आदी प्रमुख यावेळी उपस्थित होते. सोनईत यावेळी ४७ रक्तदात्यांनी रक्तदान केले. अहिल्यानगर येथील जनकल्याण रक्तपेढीच्या वतीने हे शिबीर घेण्यात आले. स्व.नितीन प्रभाकर दरंदले यांच्या पुण्यस्मरणानिमित्त दरवर्षी रक्तदान शिबीर मित्रमंडळ यावेळी पशु सेवादाता संघटना, गोल्डन मेमेरी ग्रुपचे सर्व सदस्यांनी यावेळी शिबिरासाठी मेहनत घेतली.

### ‘पंचगंगा शुगर’ने दिलेला शब्द पाळला

# पहिल्या पंधरवड्याचे केले ऊस पेमेंट

## पारदर्शक वजन काट्यामुळे शेतकऱ्यांचा विश्वास वाढला

**सार्व मंथन**
नेवासा ०५ । प्रतिनिधी

पंचगंगा शुगर अँड पॉवर प्रा. लि., महालगाव या कारखान्याने ऊस बागायतदारांना दिलेला शब्द पाळत पहिल्या पंधरवड्याचे ऊस पेमेंट वेळेवर केले आहे. १ नोव्हेंबर ते १५ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत गाळप झालेल्या सर्व ऊसाचा मोबदला १ डिसेंबर २०२५ रोजी थेट बागायतदारांच्या बँक खात्यात जमा करण्यात आला आहे.

कारखान्याने या कालावधीसाठी ऊस जातीनुसार दर निश्चित केला होता. २६५ ऊस जातीस प्रति मे.टन रु. ३,०५० आणि इतर जातींसाठी रु. ३,१५० इतका दर ठरवण्यात आला होता. ठरलेल्या दरानुसार कोणतीही कपात न करता संपूर्ण रक्कम बिनचूक खात्यात जमा झाल्याने बागायतदारांनी समाधान व्यक्त केले आहे.

यंदाच्या हंगामात कारखान्याने पारदर्शक वजन काटा व पंधरा दिवसांत पेमेंट ही प्रमुख तत्वे केंद्रस्थानी ठेवून कारभार सुरु केला आहे. वास्तविक वजन प्रमाणे ऊसाचा



हिशेब होत असल्याने, वजन काट्याबाबतच्या कोणत्याही शंका-कुशंका दूर झाल्या आहेत आणि बागायतदारांमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे. चेअरमन यांनी सुरुवातीला दिलेली वेळेवर पेमेंटची हमी प्रत्यक्षात पूर्ण करत कारखान्याने बागायतदारहिताचे धोरण जपल्याचे मानले जात आहे. वेळेत पेमेंट मिळाल्याने शेतकऱ्यांची हंगामातील पुढील खर्चाची तरतूद सुलभ झाली आहे.

पंचगंगा शुगर अँड पॉवर हा महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना खाजगी वजनकाट्यावर ऊस वजन तोलण्याची प्रथमच मुभा देणारा कारखाना ठरला आहे. या पारदर्शक धोरणामुळे कारखान्याकडे उसाचा ओढा मोठ्या प्रमाणात वाढला आहे. इतर कारखान्यांनीही अशीच मुभा द्यावी, अशी मागणी शेतकरी करत आहेत. खाजगी वजनाची मुभा न दिल्यास, कारखान्यांच्या वजन काट्यांमध्ये फेरफार होत असल्याचा संशय अधिक बळकट होतो, असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

# ओंकार बनकर यास ‘विद्यावाचस्पती’ पदवी प्राप्त

**सार्व मंथन**
राहुरी ०५ । प्रतिनिधी

राहुरी तालुक्यातील सडे येथील ओंकार सुनील बनकर यांस नुकतीच ‘भारतीय विज्ञान शिक्षण अनुसंधान आणि संस्थान, पुणे’ येथून प्रा.डॉ. रामकृष्ण जी. भट सर यांच्या मार्गदर्शनाखाली रसायनशास्त्र या विषयातून ‘विद्यावाचस्पती’ ही पदवी प्राप्त झाली आहे.



यापूर्वी डॉ. बनकर यांनी सी.एस.आय.आर-नेट या राष्ट्रीय पात्रता परीक्षेत देखील संपूर्ण भारतात ४६ वा क्रमांक मिळविला होता. त्याचबरोबर डॉ. बनकर हे आय.आय. टी-गेट परीक्षा देखील उत्तीर्ण आहेत. त्यांचे पदवीचे शिक्षण हे कला, शास्त्र व वाणिज्य महाविद्यालय, राहुरी या ठिकाणाहून तर पदव्युत्तर शिक्षण हे अहमदनगर महाविद्यालय अहमदनगर येथून झाले आहे तरी त्यांच्या या यशाबद्दल अहमदनगर महाविद्यालयाचे सन्माननीय प्राचार्य डॉ. नोयल पारगे यांनी तसेच रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. राजेश ताक, वरिष्ठ प्रा.संदीप रोहोकले व इतर सहकारी प्राध्यापक यांनी त्यांचे अभिनंदन केले.

# लांडेवाडीमध्ये कृषिकन्यांचे स्वागत

**सार्व मंथन**
सोनई ०५ । प्रतिनिधी

महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी येथील संलग्न मुळा एज्युकेशन सोसायटीच्या कृषी महाविद्यालय सोनई येथील अंतिम वर्षाच्या विद्यार्थिनी ग्रामीण कृषी, जागरूकता कार्यानुभव व कृषी औद्योगिक कार्यक्रमांतर्गत लांडेवाडी गावात दाखल झाल्या असून ग्रामपंचायतीच्यावतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. या कृषी कन्या प्रतिक्षा घुगे, संजिवणी पाटील, स्नेहल पठारे, श्रेया साळुंखे, आकांक्षा शिंदे रितीका शेगोकार यांचा समावेश असून त्या शेतकऱ्यांना विविध विषयावर मार्गदर्शन तसेच आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची माहिती देणार आहेत. गावामध्ये प्रत्यक्ष सर्वेक्षण करून शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी, त्यांचे ग्रामीण, जीवनमान, सामाजिक व आर्थिक स्तर, इ. विविध गोष्टीचा अभ्यास करणार आहेत.

## ड्रायव्हर पाहिजे (निर्व्यसनी)

अनुभवी, २५ ते ४५ वयोगटातील इच्छुकानी त्वरित संपर्क करावा. स्थानिक व्यक्तीस प्राधान्य देण्यात येईल.
संपर्क :- राहुरी तालुका सहकारी खरेदी विक्री संघ राहुरी जि.अ.नगर मो.न. ८९८३०३१५६७
(१३ नोव्हेंबर)

## राहुरीत विकणे आहे

राहुरी शहरात मध्यवर्ती भागात (विद्यामंदिरच्या मागच्या बोळात, नाईक गल्ली) येथील तळमजल्या वरील दोन खोल्या,पॅसेज, कमोड स्वतंत्र पाणी व वीज कनेक्शन असलेला वन रूम किचन फ्लॅट विकणे आहे.
-: संपर्क :-
७५८८५१३३८३, ८२७५०३३७५३
(१३ नोव्हेंबर)

फिक्स चान्स के लिए संपर्क करे
100% कोहिनुर Rs. 100/-
कल्याण राजधानी नाईट साप्ताहिक
साप्ताहिक Date : 01.12.25
कल्याण - राजधानी (डे/ना) मेन बाजार (ओपन) या (क्लोज) मेन बाजार
Date : 1.12.25

| | | | |
|---|---|---|---|
| 4 149 167 257 | 9 360 450 469 | 1 146 236 678 | 6 178 169 349 |
| 5 168 267 258 | 0 127 136 235 | 2 570 589 679 | 7 278 458 890 |
| 6 123 169 367 | 1 128 245 489 | 3 580 670 689 | 8 350 369 459 |
| 7 124 278 250 | 2 237 345 570 | 4 167 158 149 | 9 234 270 469 |
| 8 125 134 350 | 3 148 346 490 | 5 230 690 780 | 0 235 370 578 |
| 9 126 234 270 | 4 257 590 789 | 6 367 349 790 | 1 128 236 678 |

कायमचा मेंबरसाठी संपर्क साधा (अंकशास्त्रावर आधारित दुर उपयोग करु नये)

फिक्स चान्स के लिए संपर्क करे
100% कोहिनुर Rs. 100/-
कल्याण राजधानी नाईट साप्ताहिक
साप्ताहिक Date : 01.12.25
कल्याण राजधानी (डे/ना) मेन बाजार (ओपन) या (क्लोज) मेन मुंबई
100% Date Fix FREE GAME Open to Close

| सोमवार ते मंगळवार | बुधवार ते गुरुवार |
|---|---|
| 4 338 699 9 388 144 — 40 - 45 x 90 - 95 | 5 366 447 0 118 299 — 51- 56 X 01- 06 |

| शुक्रवार ते शनिवार | साप्ताहिक |
|---|---|
| 1 227 588 6 277 330 — 12 - 17 x 62 - 67 | 2 336 499 7 188 449 — 23 - 28 X 73 - 78 |

साप्ताहिक CP 10 X 45 67 X 34 12 X 23
विचार बदला नशीब बदलेल
संपर्क : 9970640587

पान १ वरून पान १ वरून

## सरकारविरोधात शिक्षकांचा एल्गार

येत आहे. भायखळ्यातील खाजगी आणि शासकीय शाळेत विद्यार्थी गणवेशात उपस्थित आहेत. पालक मुलांना शाळेत सोडताना दिसले. संघटनेचा अचानक बंदचा इशारा आणि त्यानंतर शिक्षण संचालनालयाचा कारवाई आणि वेतन कपातीचा इशारा यामुळे शिक्षक संभ्रमात असल्याचे दिसले. दरम्यान राज्यातील काही शिक्षक संघटना या बंदमध्ये सहभागी झाल्या नसून शिक्षक संघटनेत काही ८० मतभेद असल्याचे यावेळी निदर्शनास आले आहेत.

## रशियाचे अध्यक्ष पुतिन भारत दौऱ्यावर

संरक्षण सचिव पीट हेगसेथ यांनी त्यांच्या वैयक्तिक फोनवरून येमेनमधील आगामी लष्करी कारवाईशी संबंधित संवेदनशील माहिती शेअर केली. ज्यामुळे अमेरिकन सैन्यावरील धोका वाढला आहे. पेंटागॉनच्या महानिरीक्षकांच्या अहवालात ही बाब पुढे आली. संरक्षण विभागातील अनधिकृत मेसेजिंग ॲप्स आणि साधनांच्या वापरावर टीका करण्यात आली. हेगसेथने सिग्नल ॲपद्वारे दहशतवाद्यांवर अमेरिकन लष्करी हल्ल्याची योजना शेअर केली. पेंटागॉनच्या अंतर्गत नियमांचे उल्लंघन केले गेले होते. ज्यामुळे लष्करी कर्मचारी आणि त्यांची योजना धोक्यात येऊ शकते. अहवालात स्पष्टपणे म्हणण्यात आले की, हेगसेथने शत्रूच्या प्रदेशात असलेल्या अमेरिकन लढाऊ विमानांबद्दल गोपनीय माहिती यासोबतच ते कुठे आहेत आणि वेळेची संपूर्ण माहिती त्यांच्या ऑपरेशनच्या दोन ते चार तास अगोदर शेअर केली. याकरिता त्यांनी ॲपची मदत घेतली. ज्यामुळे या ऑपरेशनला आणि अमेरिकन लष्कराला धोका झाला. यावर हेगसेथने म्हटले की, कोणतीही गोपनीय माहिती शेअर करण्यात आली नाही. मी पूर्णपणे निर्दोष आहे. यासह, हे प्रकरण बंद झाले आहे. बॉम्बहल्ला करण्यात आला. मात्र, या प्रकारामुळे अमेरिकेत मोठी खळबळ उडाली आहे. पुतिन यांच्या भारत दौऱ्यादरम्यान राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे नेमके काय बोलतात याकडे सर्वांच्या नजरा आहेत. पुतिन हे भारत दौऱ्यावर येणे अमेरिकेचा अजिबातच पटले नाहीये.

## दोन कर्मचारी अटकेत

पोहोचला याची माहिती घेतली आहे. दरम्यान सचिन शेटे व संजय पवार या दोघांकडे सायबर पोलिसांनी चौकशी केली व त्यांना गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे. त्यांच्या चौकशीत काय समोर येणार यावर गुन्ह्याचा तपास अवलंबून असणार आहे. उशिरा का होईना पण सायबर पोलिसांनी या गुन्ह्यात दोघांना अटक केली असल्याने पुढील तपासाला गती येणार आहे.

## थोडक्यात

### देहरे येथे दिव्यांग बांधवांना क्रीडा साहित्याचे वाटप



सार्व मंथन अहिल्यानगर ०५ । देहरे ग्रामपंचायत आणि एटीटीएफ क्रीडा संघटनेच्या संयुक्त विद्यमाने जागतिक दिव्यांग दिन उत्साहात पार पडला. देहरे येथे झालेल्या कार्यक्रमात सामाजिक बांधिलकी जपत ग्रामपंचायतीकडून परिसरातील दिव्यांग बांधवांना क्रीडा साहित्याचे वाटप करून त्यांचा सन्मान करण्यात आला. दिव्यांग व्यक्तींमध्ये आत्मविश्वास वाढविणे, त्यांच्यातील कौशल्यांना प्रोत्साहन देणे आणि समाजात समानतेचा संदेश देणे या उद्देशाने हा उपक्रम पार पडला. ग्रामपंचायतीच्या वतीने दिव्यांग बांधवांसाठी आवश्यक क्रीडा साहित्यांचे वाटप करण्यात आले. या साहित्यामुळे दिव्यांग खेळाडूंना प्रोत्साहा मिळणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. या कार्यक्रमात सेवानिवृत्ती शिक्षक हबीब शेख यांचा विशेष सत्कार करण्यात आला. शिक्षण क्षेत्रातील त्यांचे कार्य, विद्यार्थ्यांप्रती असलेली निष्ठा आणि सामाजिक सहभाग याबद्दल उपस्थित मान्यवरांनी त्यांचे कौतुक केले. शेख यांच्या सेवाभावी वृत्तीचा गौरव करत गावकऱ्यांनी त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमास सरपंच शितल अनिल चोर, उपसरपंच प्रकाश लांडगे, ग्रामपंचायत सदस्य साजिद शेख, ग्रामविकास अधिकारी कृष्णा बडे, तंटामुक्ती अध्यक्ष विठ्ठल पठारे, माजी तंटामुक्ती अध्यक्ष रमेश काळे, खरेदी-विक्री संघाचे माजी संचालक संजय शिंदे, एटीटीएफ क्रीडा संघटनेचे महाराष्ट्र संस्थापक व अध्यक्ष सुहास मोरे, बाबासाहेब गायकवाड, भानुदास भगत, बापूसाहेब चोर, अनिल चोर, राष्ट्रवादी तालुका उपाध्यक्ष शुभम पुंड, भाजपा दिव्यांग महाविकास आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष चंद्रकांत काळे, तसेच भाऊसाहेब रामराव काळे, भाऊसाहेब भानूदास काळे, मेघनाथ धनवटे, बबन करंडे, शंकर तोडमल, योगेश पिंपळे, धोंडिराम धनवटे, गणेश पुंड, अंबादास लांडगे, रतन पडागळे, ग्रामपंचायत व सोसायटीचे सर्व सदस्य आणि दिव्यांग नागरिक उपस्थित होते. संजय शिंदे आणि माजी सरपंच सुभाष खजिनदार यांनी मार्गदर्शन करत दिव्यांगांच्या विकासासाठी अधिक उपक्रम राबविण्याची गरज अधोरेखित केली. सुहास मोरे यांनी सर्व मान्यवरांचे आभार मानत दिव्यांग बांधवांसाठी अशा प्रकारचे कार्यक्रम पुढील काळातही आयोजित करण्याचे आश्वासन दिले.

### सोनईत विविध ठिकाणी दत्त जन्मोत्सव सोहळा उत्साहात



सार्व मंथन सोनई ०५ । सोनई येथील श्री स्वामी समर्थ अध्यात्मिक केंद्रात दत्त जयंतीनिमित्त सात दिवस अखंड नामजप, स्वामी चरित्र वाचन होत असुन सोनई परिसरात महानैवेद्य व आरती सोहळ्याने दत्त जन्मोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. स्वामी समर्थ केंद्रात मुख्य दरबारास आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली होती.सकाळी अभिषेक, पूजा करून गुरुचरित्राचे पारायण पूर्ण करण्यात आले त्यानंतर देवीचे अलंकार अर्पण करण्यात येऊन बली पूर्णाहुती देऊन गुरुचरित्र पारायणाची सांगता करण्यात आली दुपारी गुरुचरित्र ग्रंथातील चौथ्या अध्यायाचे वाचन केले जन्माची ओवी पूर्ण होताच उपस्थित सेवेकरी व भाविकांनी अवधूतचिंतन गुरुदेव दत्त नामाचा जयघोष केला आरती सोहळा व मंत्र पुष्पांजली झाल्यानंतर उपस्थित सेवेकऱ्यांना प्रसाद म्हणून पेढे, केळी, साबुदाणा खिचडी फराळाचे वाटप करण्यात आले. या केंद्रात गुरुचरित्र पारायण सप्ताह निमित्त यज्ञ मंडपात देवता मंडल स्थापन करून गणेश, मनोबोध, गीताई, चंडी, स्वामी, रुद्र व मल्हार याग झाले. सोनई परिसरातील श्रीरामवाडी, घावटे वस्ती, बेल्हेकरवाडी, लांडेवाडी, गणेशवाडी, पानसवाडी येथील मित्र मंडळासह संतोष खोसे यांच्या वस्तीवर दरवर्षीप्रमाणे यावर्षीही दत्त जयंती उत्सव साजरा करण्यात येईल महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. आज शुक्रवारी स्वामी समर्थ केंद्रात श्री दत्त पूजन, देवता विसर्जन, नैवेद्य आरती, नाम, जप, यज्ञ सप्ताहाची सांगता होऊन गुरुचरित्र ग्रंथ उचलण्यात येणार आहे व त्यानंतर महाप्रसाद वाटप होऊन सप्ताहाची सांगता होणार आहे.

महाराष्ट्र शासन महसूल विभाग
तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी राहुरी, जि. अहिल्यानगर
E-mail id-tahasilrahuri11@gmail.com दूरध्वनी क्र. (०२४२६) २३२६६०
क्र./ दंडव्य/जन्म/एसआरनं./३१/२०२५ राहुरी, दि. ०३/१२/२०२५

जाहीर नोटीस

राहुरी येथील मा. तहसीलदार यांचे न्यायालयात...
अर्जदार-श्रीमती काजल अबिता गागडे, रा. राहुरी बु., ता. राहुरी, जि. अहिल्यानगर
विरुध्द
सामनेवाले-मुख्याधिकारी, नगरपरीषद राहुरी, ता. राहुरी, जि. अहिल्यानगर

श्रीमती काजल अबिता गागडे रा.राहुरी बु., ता. राहुरी, जि. अहिल्यानगर यांनी दि. २४/०६/२०२५ रोजी या कार्यालयात अर्ज देऊन त्यांची मुलगी जान्हवी अबिता गागडे यांचा जन्म दि. ३०/०५/२०२० रोजी राहुरी बु., ता. राहुरी येथे झाला असून जन्माची नोंदणी होऊन दाखला मिळावा म्हणून विनंती केली आहे. प्रस्तूत अर्जाची पोलीस निरीक्षक राहुरी, ग्राम महसूल अधिकारी राहुरी बु. यांचेमार्फत सविस्तर चौकशी केली असून त्यांनी खालीलप्रमाणे अहवाल सादर केला आहे.

मुख्याधिकारी, नगरपरीषद राहुरी, ता. राहुरी, जि. अहिल्यानगर यांनी जान्हवी अबिता गागडे यांचा जन्म दि.३०/०५/२०२० रोजी राहुरी बु., ता. राहुरी येथे झालेला आहे. परंतू, राहुरी बु. गावचे सन २०२० सालचे जन्म नोंदणी रजिस्टर पाहिले असता सदर रजिष्टरमध्ये जन्माची नोंद आढळून येत नाही. असा दि. २६/०७/२०२५ रोजी दाखला दिला आहे. तसेच अर्जदार श्रीमती. काजल अबिता गागडे यांनी दि.२३/०६/२०२५ रोजी प्रतिज्ञापत्र नोंदवून दिले आहे.

तरी जान्हवी अबिता गागडे यांचे जन्माची नोंद होणेबाबत कोणाची कोणतीही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत तहसिल कार्यालय राहुरी येथे कागदोपत्री पुराव्यासह सदरची हरकत दाखल करावी. अन्यथा सदर मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास सदर जन्माच्या नोंदीबाबत कोणाचीही हरकत नाही असे समजून तसा आदेश पारीत करणेत येईल. तद्नंतर कोणाचीही कोणतीही हरकत अथवा तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

सदरची जाहिर नोटीस आज दि. ०३/१२/२०२५ रोजी माझे सही व कार्यालयाच्या शिक्क्यानिशी दिली आहे.

नामदेव पाटील,
तहसीलदार, राहुरी

## शहरी व ग्रामीण भागात प्राणीक्लेश नियंत्रण उपाययोजना

# प्रभावीपणे राबवा : जिल्हाधिकारी डॉ. आशिया

सार्व मंथन
अहिल्यानगर ०५ । प्रतिनिधी

जिल्ह्यात भटक्या प्राण्यांमुळे निर्माण झालेल्या समस्या, अपघातांचे प्रमाण, नागरिकांची सुरक्षितता, तसेच प्राणीक्लेशासंबंधी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांची काटेकोरपणे अंमलबजावणी करत शहरी व ग्रामीण भागांमध्ये प्राणीक्लेश नियंत्रण उपाययोजना प्रभावीपणे राबविण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हास्तरीय प्राणीक्लेश प्रतिबंध समितीची बैठक जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली, त्याप्रसंगी ते बोलत होते.



या बैठकीस महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे, उपवनसंरक्षक धर्मवीर साळविठ्ठल, पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. उमेश पाटील, नगरपालिका प्रशासनाचे सहायक आयुक्त अभिजीत हराळे तसेच संबंधित विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय व खासगी शैक्षणिक संस्था, न्यायालये, बसस्थानके व रेल्वे स्थानकांमध्ये भटक्या श्वानांचा प्रवेश रोखण्यासाठी आवश्यक कुंपण, सीमा भिंती, दरवाजे तसेच अन्य संरचनात्मक उपाययोजना करून परिसर सुरक्षित करावा. भटक्या श्वानांचे निर्बिजीकरण, लसीकरण व जंतनिर्मूलन करणे, निवाऱ्याची सोय करणे व बांधण्यासाठी निश्चित जागा उपलब्ध करून देणे, तसेच तक्रार निवारणासाठी हेल्पलाईन सुरू करून ती जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचनाही जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी यावेळी दिल्या.

जिल्ह्यातील महामार्ग व द्रुतगती मार्गांवर भटकी गुरे अथवा पशू दिसल्यास त्यांना अधिकृत आश्रयस्थाने, गोशाळा किंवा गोठ्यात हलविण्यात यावे. भटक्या जनावरांमुळे अपघात झाल्यास अथवा नागरिकांना भटकी जनावरे रस्त्यावर आढळल्यास त्वरित तक्रार करता यावी, यासाठी सर्व प्रमुख मार्गांवर नियमित अंतरावर हेल्पलाईन क्रमांक स्पष्टपणे प्रदर्शित करण्यात यावा. हा क्रमांक स्थानिक पोलीस विभाग व जिल्हा नियंत्रण कक्षाशी जोडण्यात यावा.

जिल्ह्यातील सर्व शासकीय आणि खाजगी रुग्णालयांमध्ये अँटी रेबीज लस आणि इम्युनोग्लोबुलिनचा आवश्यक साठा उपलब्ध राहील, याची दक्षता घ्यावी. यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या इतर सर्व निर्देशांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याच्या सूचनाही जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिल्या.

# निवडणूक लांबणीवर : प्रचार थांबला; खर्च सुरूच

## 'रात्रीची सोय' मागणाऱ्यांमुळे मोबाईल स्विच ऑफ!

सार्व मंथन
नेवासा ०५ । प्रतिनिधी

नेवासा नगरपंचायत निवडणूक ऐन दोन दिवसांवर असताना १८ दिवसांसाठी पुढे ढकलल्याने उमेदवारांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडले आहे. मतदानाची तारीख जवळ असल्याच्या समजुतीत अनेक उमेदवारांनी विजय डोळ्यांसमोर ठेवत मुक्त उधळपट्टी केली होती. मात्र आता पुढील टप्पा अधिक लांबचा असल्याचे लक्षात येताच, उरलेला खर्च कसा भागवायचा, या चिंतेने अनेक उमेदवार मेटाकुटीला आले आहेत. विशेष म्हणजे, प्रचार थांबला असला तरी कार्यकर्त्यांचे फोन थांबलेले नाहीत; 'रात्रीची सोय' आणि खर्चाच्या मागण्यांमुळे अनेक उमेदवारांनी रात्री मोबाईल स्विच ऑफ ठेवणेच सुरक्षित मानले आहे.

निवडणूक पुढे ढकलल्याचा सर्वात मोठा फटका उमेदवारांना आर्थिक आघाडीवर बसला आहे. मतदान जवळ आले असताना जेवणावळी, बैठका आणि इतर बाबींवर मोठ्या प्रमाणात खर्च करण्यात आला होता. आता पुढील १८ दिवसांसाठी तोच खर्च पुन्हा उभा करणे जणू दुसरी निवडणूक लढण्यासारखे आव्हान बनले आहे.

निवडणूक 'हाताशी' आल्याचा गैरसमज करून अनेक उमेदवारांनी शेवटच्या टप्प्यात कोणतीही तमा न बाळगता पैसा खर्च केला. आता तोच खर्च 'दुप्पट' करण्याची वेळ आल्याने अनेकांचे आर्थिक बजेट पूर्णपणे विस्कटले आहे. निवडणूक लांबणीवर गेल्यानंतर कार्यकर्त्यांना निवडणुकीच्या 'मोड'मध्ये ठेवणे हे उमेदवारांसमोरचे सर्वात मोठे आव्हान ठरले आहे. पुढील १८ दिवस कार्यकर्ते सक्रिय ठेवण्यासाठी मनोधैर्याबरोबरच खर्चाचे सुद्धा कसब लागणार आहे. विशेषतः 'रात्रीची सोय' या मुद्द्यावरच अनेक कार्यकर्ते अधिक जागरूक दिसत असल्याचे चित्र आहे. सततच्या खर्चाच्या मागण्या आणि अखंड धावपळीमुळे अनेक उमेदवार मानसिक व आर्थिक थकव्याच्या अवस्थेत पोहोचले आहेत. त्यामुळे काही उमेदवारांसाठी रात्री मोबाईल स्विच ऑफ ठेवणे हाच सध्या सर्वात स्वस्त व प्रभावी उपाय ठरत आहे. परिणामी, कार्यकर्ते व उमेदवार यांच्यात संवादाची दरी वाढत असल्याचे चित्र आहे.

## बिबट्याच्या हल्ल्यात

# महिलेला गमवावा लागला जीव

सार्व मंथन
पारनेर ०५ । प्रतिनिधी

### किन्ही गावात भीतीची वातावरण

पारनेर तालुक्यातील किन्ही गावात मंगळवारी संध्याकाळी चारच्या सुमारास घडलेल्या हृदयद्रावक घटनेने संपूर्ण गाव शोकसागरात बुडाला आहे. गावातील ज्येष्ठ नागरिक कै. भागुबाई विश्वनाथ खोडदे (वय७०) यांचा बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झाल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, भागुबाई खोडदे या आपल्या शेतात नेहमीप्रमाणे काही कामासाठी गेल्या होत्या. त्याच वेळी झाडीत दडून बसलेल्या बिबट्याने अचानक झडप घालत त्यांच्यावर हल्ला चढवला. क्षणभरात परिस्थिती गंभीर झाली. मदतीसाठी झालेल्या आरडाओरड्यावर ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली, मात्र तोपर्यंत भागुबाई गंभीर जखमी झाल्या होत्या आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला.

घडलेल्या घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले असून बिबट्याच्या हालचालींचा मागोवा घेण्यासाठी शोधमोहीम सुरू करण्यात आली आहे. परिसरातील वाढत्या बिबट्यांच्या वावरामुळे ग्राम स्थांमध्ये अस्वस्थता, भय आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

ग्रामस्थांनी प्रशासनाकडे तातडीने सुरक्षा उपाययोजना, प्रबोधन आणि बिबट्याच्या हलचाली रोखण्यासाठी योग्य ती कृती करण्याची मागणी केली आहे. 'आज आमच्या गावातील एका ज्येष्ठ मातृमुख्याला बिबट्याने उचलून नेले उद्या कोण?' असा प्रश्न लोकांमध्ये उमटत आहे.

## बेलगाव ग्रामपंचायतीतील पाणीपुरवठा पद भरतीतील

# कथित घोटाळ्यावर चौकशी व पुनर्परीक्षेची मागणी

सार्व मंथन
शेवगाव ०४ । प्रतिनिधी

### ८ डिसेंबरपासून आमरण उपोषणाची चेतावणी

बेलगाव (ता. शेवगाव) येथील ग्रामस्थ व परीक्षार्थ्यांनी पाणीपुरवठा पदभरती प्रक्रियेत गंभीर अनियमितता झाल्याचा आरोप करत चौकशी, दोषींवर कायदेशीर कारवाई आणि नव्या भरती परीक्षा घेण्याची मागणी केली आहे. पंचायत समिती कार्यालयात दिलेल्या निवेदनात ८ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता आमरण उपोषणास सुरुवात करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

निवेदनानुसार १६ ऑक्टोबर रोजी जाहीर झालेल्या जाहिरातीमध्ये संगणक ज्ञानाची अट वगळल्यामुळे अनेक उमेदवार वंचित राहिले. ४ नोव्हेंबर रोजी जि.प. प्रा. शाळेत घेतलेल्या परीक्षेत ग्रामसेवक व सरपंच पती यांच्या संगनमताने त्यांच्या नातलगास परीक्षेत मदत करून सर्वाधिक गुण मिळवून निवड केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

तक्रार असूनही चौकशी नाही, उलट निवड मंजूर असे ग्रामस्थांचे म्हणणे. परीक्षेच्या वेळी शाळेतील सीसीटीव्ही प्रणाली जाणीवपूर्वक बंद ठेवण्यात आल्याची शंका व्यक्त करण्यात आली आहे. परीक्षेदरम्यान सरपंच पतीची उपस्थिती कोणत्या कायद्याने परवानगी देण्यात आली हा देखील कळीचा सवाल निवेदनात उपस्थित केला आहे.

निवेदनातील प्रमुख मागण्या खालीलप्रमाणे परीक्षेची निष्पक्ष चौकशी, ग्रामसेवक व सरपंच पती, यांच्या कारभाराची तपासणी, कथित घोटाळ्यावर गुन्हा नोंदविणे, विद्यमान नियुक्ती रद्द करणे, नव्या भरतीसह संगणक ज्ञानाची अट समाविष्ट करणे, ग्रामसेवक मुख्यालयी राहत नसल्याची चौकशी करावी.

पुढे ग्रामस्थांनी नमूद केले की हे निवेदन तहसीलदार, शेवगाव तसेच पोलीस निरीक्षक, शेवगाव यांनाही प्रत स्वरूपात पाठविण्यात आले आहे, जेणेकरून प्रकरणाची कायदेशीर पडताळणी होऊ शकेल.

सदर निवेदनावर मधुकर पोपळे, अरुण पोपळे, विजय काकडे, योगेश गायके, हरिभाऊ केसभट, संदीप काकडे, संदीप पोपळे, सचिन पोपळे, संतराम पोपळे, कल्याण सुरासे, अक्षय जाधव यांच्या सह्या असून ग्रामस्थांचा आवाज न्यायासाठी पुढे नेण्यात आला आहे. प्रशासनाने प्रकरण गांभीर्याने हाताळावे, अन्यथा आमरण उपोषण अपरिहार्य होईल, असा इशारा देण्यात आला आहे.

# कोल्हार खुर्दमध्ये मायलेकांवर लोखंडी रॉडने हल्ला

सार्व मंथन
राहुरी फॅक्टरी ०५ । प्रतिनिधी

## सुनेच्या रागातून मारहाण; दोघांवर गुन्हा दाखल

राहुरी तालुक्यातील कोल्हार खुर्द येथे घरगुती वादातून संतापाने सुनेने आणि तिच्या साथीदाराने मायलेकांना शिवीगाळ करत लोखंडी रॉडने मारहाण केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी दोन जणांविरुद्ध राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सुरेखा रभाजी भोसले यांनी दिलेल्या फिर्यादीमध्ये म्हटले आहे की, त्यांच्या मुलाचे दोन वर्षांपूर्वी दुर्गा उर्फ शितल हिच्याशी लग्न झाले होते. ती काही काळ नांदून सासरी-माहेरी असे ये-जा करत होती. गुरुवारी सायंकाळी दुर्गा उर्फ शितल आणि तिचा साथीदार रुपेश सुभाष वाघमारे हे दोघे भोसले यांच्या घरी आले.

सुरेखा भोसले यांनी घराचे कुलूप उघडून दिल्यानंतर सून दुर्गा ही आपले कपडे गोळा करीत होती. यावेळी सुरेखा भोसले यांनी 'फक्त तुझेच कपडे घे' असे सांगताच ती संतापली आणि शिवीगाळ करू लागली. तिच्या वागण्यावर मुलगा स्वप्निलने हरकत घेतल्यावर रुपेश वाघमारेने हातातील लोखंडी रॉडने स्वप्निलच्या डोक्यात, पोटावर, हात-पायावर बेदम मारहाण केली.

दरम्यान, सुनेने सुरेखा भोसले यांना ढकलून दिले तर दोघांनी मिळून मायलेकांना लाथाबुक्यांनी मारहाण करत 'सोडणार नाही' अशी धमकी देत पळ काढला. घटनेनंतर नातेवाईकांनी स्वप्निलला ॲम्ब्युलन्सने राहुरी पोलीस ठाण्यात नेले. त्यानंतर त्याला राहुरी ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

या प्रकरणी सुरेखा भोसले यांच्या फिर्यादीवरून दुर्गा उर्फ शितल स्वप्निल भोसले व रुपेश सुभाष वाघमारे (रा. सावेडी, अहिल्यानगर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## सोनईतील हॉटेल व्यावसायिकावर

# प्राणघातक हल्ला

सार्व मंथन
सोनई ०५ । प्रतिनिधी

सोनई-बेल्हेकरवाडी रस्त्यावरील हॉटेल व्यावसायिक लखन जगदाळे यांच्या हॉटेलमध्ये बुधवारी रात्री अज्ञात इसमांनी प्राणघातक हल्ला केला आहे.

बुधवार दिनांक ४ डिसेंबर रोजी लखन जगदाळे हे स्वतः च्या हॉटेलमध्ये असताना आलेल्या इसमांनी अचानकपणे हल्ला केला या हल्ल्यात जगदाळे हे गंभीर जखमी झाले त्यांना सोनई येथील खाजगी रुग्णालयात नेले असता अहिल्यानगर येथे तात्काळ उपचारासाठी डॉक्टरांनी पाठवले असल्याचे समजते सध्या अहिल्यानगर येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असुन जबाबानंतरच गुन्हा दाखल होणार आहे. याप्रकरणी सोनई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल नसला तरी पोलीसांनी तपास सुरू केला असल्याचे समजते.

## श्रीरामपूरच्या नागरिकांची दैना

# नळातून धुरकट, दुर्गंधीयुक्त गटारीचे पाणी!

### नगरपालिका निवडणुकीच्या उंबरठ्यावरच मूलभूत सुविधांचा बोजवारा

सार्व मंथन
श्रीरामपूर ०५ । प्रतिनिधी

शहरातील पूर्व व उत्तर भाग गेली अनेक वर्षे गंभीर पाणीप्रश्नाला सामोरे जात असून पंजाबी कॉलनी, दशमेशनगर, सिंधी कॉलनी, नेहरुनगर, आदर्श हौसिंग सोसायटी, काझीबाबा रोड, आदर्शनगर अशा मोठ्या परिसरात नागरिकांना नळातून अक्षरशः गटारीचे मिश्रीत, दुर्गंधीयुक्त घाण पाणी मिळत आहे. या अस्वच्छ पाण्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून हा प्रश्न आता ज्वलंत स्वरूप धारण करत आहे.

नागरिकांनी संबंधित नगरपालिका अधिकाऱ्यांकडे असंख्य तक्रारी नोंदवूनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई झाली नसल्याने परिसरातील लोक त्रस्त झाले आहेत. वर्षानुवर्षे चालत आलेला हा प्रश्न सोडवण्यासाठी आजवर कोणत्याही नगरसेवक वा लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेतलेला नसल्याची नाराजी नागरिकांनी व्यक्त केली आहे. 'मतदानापूर्वी आश्वासने, आणि निवडणूक झाल्यावर गायब होणारे लोकप्रतिनिधी' असा अनुभव असल्याचे नागरिक सांगतात.

सध्या नगरपालिकेची निवडणूक दारात आली असताना, शहरातील आजी-माजी नगरसेवक व भावी उमेदवारांनी या गंभीर प्रश्नावर काय भूमिका घेतली जाणार? हा प्रश्न जनतेसमोर उभा आहे. यावेळीही केवळ पोकळ आश्वासने देऊन लोकांना भूलवले जाणार का, अशी चर्चा सर्वत्र रंगू लागली आहे.

नागरिकांच्या मते, योग्य उमेदवार निवडून देण्याची जबाबदारी यंदाच्या निवडणुकीत अधिक महत्त्वाची ठरत आहे. कारण या मूलभूत, प्रलंबित प्रश्नाचे निराकरण योग्य नेतृत्व आणि प्रामाणिक इच्छाशक्तीनेच शक्य आहे.

परिसरातील संतप्त नागरिकांनी या समस्येला तातडीची दखल देऊन कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.



घर बांधताय...!
FinOlex PIPES
नगर जिल्ह्यात सर्वात कमी दरात फिनोलेक्स मटेरियल!
तर मग चला, प्लंबिंग पी.व्हि.सी सॅनिटरी आणि टाईल्स करिता...
सुनिल सेल्स कॉर्पोरेशन बारागाव नांदूर रोड, राहुरी, जि. अ.नगर
। प्रोप्रा. सुनिल भट्टड ९८२२ ४२८६९९ । विजय भट्टड ९८९०४३३४१०



मराठी व इंग्रजी कॉम्प्युटर टायपिंग
शासकीय-निमशासकीय कार्यालयातील कोणत्याही पदाच्या नोकरीसाठी उपयुक्त नव्हे तर अनिवार्य असा MPSC च्या सर्व पोस्टसाठी लागू असलेला
शासकीय कॉम्प्युटर टायपिंग कोर्स
महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त : अधिकृत प्रशिक्षण केंद्र
* क्लासची वैशिष्ट्ये *
। महाराष्ट्र शासनाचे अधिकृत प्रमाणपत्र
। सुसज्ज कॉम्प्युटर लॅब
। गरजू विद्यार्थ्यांसाठी माफक फी
विघ्नहर कॉम्प्युटर
अधिक माहितीसाठी संपर्क
धोंडे पाटील कॉम्प्लेक्स, गोकुळ कॉलनी, कॉलेज रोड, राहुरी
98 60 87 29 18 ☎ : 02426-295118
२० फेब्रुवारी २५

## मंथन फटकारे

अनुसंगम तथा बाळासाहेब शिंदे
मो. ९५०३९५९९५७

रिल्सस्टार सुंदर, निघाली चोरटी, पावणेदोन लाखाचा मोबाईल–वृत्त

**– विनाशकाले विपरीत बुद्धी! रिल्स खूप चांगल्या असल्या तरी मूळ धंदा सोडता येत नाही ना? तीच खरी कष्टाची भाकर?**

भाजपला विजयी घोषित करा–काँग्रेस नेते

**– अशीच लोकशाहीची व संविधानाची 'तोडफोड' होत राहिली तर, निवडणुकाच होणार नाहीत, डायरेक्ट सत्ता आणि भा..ज..प...?**

राहुरी शहरात आढळला बिबट्या–चर्चा

**– यात चुक कोणाची? आपण जंगलतोड करून त्यांच्या वस्त्यांवर आक्रमण केले? आता त्यांनी मानवी वस्त्यांवर आक्रमण सुरु केले?**

मोदी दबावासमोर न झुकणारे नेते–पुतीन

**– आता रशियाचे अध्यक्ष जर असे म्हणत असतील तर असे समजावे का कि 'बोलबच्चन शेठने' त्यांना पण 'गंडादोरा' केला कि काय?**

महाराष्ट्राच्या कर्जाचा बोजा ९ लाख कोटींवर–वृत्त

**– कर्ज कितीही वाढू द्या, पण दौरे, घोषणा, जाहिराती, धार्मिक सोहळे, मंत्र्यांचा थाटमाट कमी होईल का?**

भिल्ल समाजास जि.प. अध्यक्ष पद देणाऱ्या पक्षालाच मतदान करणार–अहिरे

**– राहुरी नगर परिषदेच्या निवडणूकित अध्यक्ष पदासाठी डावललेच ना? वंचित, शिवसेनेने उमेदवारी दिली पण मतदान...?**

## राहुरीतील स्थगित प्रभाग २-अ मधिल
# निवडणुकीला वेग
### जिल्हाधिकाऱ्यांचा सुधारित कार्यक्रम जाहीर




**सार्व मंथन**
**राहुरी ०५ । प्रतिनिधी**

राहुरी नगरपरिषदेच्या स्थगित प्रभाग क्रमांक २–अ (अनुसूचित जाती महिला) या जागेच्या निवडणुकीला आता वेग आला आहे. न्यायालयीन आदेशामुळे रोखण्यात आलेल्या या प्रभागाच्या नगरसेवक पदासाठीचा सुधारित कार्यक्रम जाहीर करत जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी राजकीय वातावरणात नवीन हालचालींना सुरुवात केली आहे.

सुधारित कार्यक्रमानुसार ४ डिसेंबरपासून नामनिर्देशन दाखल करता येणार असून, १० डिसेंबर रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत निश्चित करण्यात आली आहे. आवश्यक असल्यास २० डिसेंबर रोजी सकाळी साडेसात ते दुपारी साडेपाचदरम्यान मतदान पार पडणार आहे. मतमोजणी २१ डिसेंबर २०२५ रोजी होणार असून निकाल जाहीर केले जाणार आहेत.

दरम्यान, न्यायालयीन निर्णयामुळे स्थगित ठेवण्यात आलेल्या या प्रभागाच्या निवडणुकीकडे आता राहुरीकरांचे विशेष लक्ष लागले आहे. एकाच नगरसेवक पदासाठी होणारी ही निवडणूक स्थानिक राजकारणात नवा कल निर्माण करण्याची क्षमता बाळगून असल्याने सर्वच पक्षांनी कंबर कसली आहे.

या सुधारित कार्यक्रमामुळे प्रभाग २–अ मध्ये राजकीय हालचालींना उधाण आले असून, उमेदवारांची धावपळ, चर्चा आणि रणनीती आखणीला सुरुवात झाली आहे. तर या प्रभागात शहरातील सर्वच राजकीय पक्षाचे नेत्यांचे लक्ष असणार आहे.

## बांधावरच्या वादातून
# सावत्र लेक-सुनांचा हल्ला
### जीवे मारण्याची धमकी

**सार्व मंथन**
**बारागाव नांदूर ०५ । प्रतिनिधी**

शेताच्या बांधावर ट्रॅक्टर घालून ज्वारी पिकांचे नुकसान केल्याचा जाब विचारण्यासाठी गेलेल्या महिलेवर सावत्र लेक–सुनांनी हल्ला करून ट्रॅक्टर अंगावर घालण्याची धमकी दिल्याची संतापजनक घटना राहुरी तालुक्यातील कुरणवाडी येथे घडली.

मंदाबाई राधु सानप (रा. कुरणवाडी) यांनी राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, त्यांचा सावत्र मुलगा नवनाथ राधु सानप हा २ डिसेंबर रोजी दुपारी घोरपडवाडी शिवारातील शेतात ट्रॅक्टरने नांगरट करत होता. नांगरट करताना त्याने सामाईक बांधावर ट्रॅक्टर घालून ज्वारी पिकांचे नुकसान केले.

याबाबत समजावण्यासाठी गेलेल्या मंदाबाईंना नवनाथने ट्रॅक्टरसमोर आडव्या येऊ नकोस, नाहीतर अंगावर घालून मारून टाकीन, अशी धमकी दिली. त्यानंतर त्यांच्या हाताला धरून नांगरटीत ढकलले. त्या खाली पडताच नवनाथची पत्नी शोभा सानप व शाम्पल भानुदास (पूर्ण आडनाव उपलब्ध नाही) यांनी त्यांना पकडून लाथाबुक्यांनी मारहाण केली.

यावेळी नवनाथने दगडाने त्यांच्या पाठीत जोरदार प्रहार केला. परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे पाहून पती सानप हे मदतीला आले असता नवनाथने त्यांनाही शिवीगाळ करून तोंडावर बुक्क्यांनी मारहाण केली.

या प्रकरणी मंदाबाई सानप यांच्या फिर्यादीवरून नवनाथ राधु सानप, शोभा नवनाथ सानप (दोघे रा. कुरणवाडी), तसेच शाम्पल भानुदास व त्याचा मुलगा भैय्या (पूर्ण नाव उपलब्ध नाही, रा. राणेगाव शिंगोरी, ता. शेवगाव) यांच्या विरोधात राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# नाशिक-पुणे रेल्वे संगमनेर मार्गासाठी जन आंदोलन
### आ. तांबे; संगमनेरकरांचा रेल्वेसाठी मोठा लढा

**सार्व मंथन**
**संगमनेर ०५ । प्रतिनिधी**

मुंबई नाशिक पुणे या सुवर्ण त्रिकोणामध्ये संगमनेर येत असून नाशिक पुणे रेल्वे करता लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे. मात्र राजकीय स्वार्थासाठी नाशिक पुणे रेल्वे चा मार्ग बदलला असून कोणतेही तांत्रिक कारण न सांगता संगमनेर जुन्नर नारायणगाव मार्गे रेल्वे होण्याकरता मोठे जल आंदोलन उभारण्यात येणार असल्याचे आमदार सत्यजित तांबे यांनी म्हटले असून नाशिक पुणे रेल्वे ही संगमनेर मार्गेच व्हावी अशी मागणी वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी केली आहे.

नाशिक पुणे रेल्वे ही शिर्डी अहिल्यानगर मार्गे पुणे जाणार अशी घोषणा लोकसभेमध्ये रेल्वेमंत्री वैष्णव यांनी केली यानंतर संगमनेर सह सिन्नर नारायणगाव चाकण या भागामध्ये नागरिकांमध्ये नाराजी पसरली यानंतर संगमनेर मध्ये सर्वपक्षीय नागरिकांनी तातडीने बैठकीत जनआंदोलन उभारण्याचा निर्धार केला.

यावेळी बोलताना आमदार सत्यजित तांबे म्हणाले की, पुण्यावरून पुणतांबा असा उलटा प्रवास असून नाशिक पुणे रेल्वे ही संगमनेर मंचर चाकण मार्गे झाली पाहिजे यासाठी मोठा लढा उभारण्यात येणार आहे. उद्यापासून तातडणे संगमनेर तालुक्यात सह्यांची मोहीम डिजिटल कॅम्पिंग व ऑनलाईन ब्रिटिशन दाखल करण्यात येणार आहे.

# रणजीत राजळे यांना पीएचडी प्रदान

सार्व मंथन ✍ राहुरी ०५ । अहिल्यानगर जिल्हा मराठा संस्थेच्या नेप्ती येथील छत्रपती शिवाजी महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयात कार्यरत असलेले प्रा. रणजीत वसंतराव राजळे यांना जगदीश प्रसाद विद्यापीठ, राजस्थान यांचे कडून पीएचडी प्रदान करण्यात आली आहे. मेकॅनिकल इंजीनियरिंग मधून 'मॅथेमॅटिकल मॉडेलिंग अँड ऑप्टिमायझेशन ऑफ सस्पेन्शन सिस्टम फॉर राईट कम्फर्टेबल अँड ह्यूमन हेल्थ क्रिटेरिया' या विषयावर विद्यापीठातील डॉ. चक्रधर गौड व डॉ. महेश नगरकर यांच्या मार्गदर्शनाखाली पदवी प्राप्त केली.

# नगरमध्ये शाळेत शिक्षिकेकडून धर्मांतराचा प्रयत्न?
### आ. जगतापांसह पालकांनी घेतली पोलीस अधीक्षकांची भेट

**सार्व मंथन**
**अहिल्यानगर ०५ । प्रतिनिधी**



शहरातील एका खाजगी शिक्षण संस्थेतील मुस्लिम महिला शिक्षिकाकडून विद्यार्थ्यांना धर्मांतराबाबतचे धडे देत असून तिचे इंटरनॅशनल कॉल उघडकीस आले असून त्या महिलेवर फिर्याद दाखल झाली असून येत्या पाच दिवसांमध्ये कडक कारवाई करून अटक न केल्यास तीव्र स्वरूपाचा मोर्चा काढण्यात येईल संस्था चालकांनी देखील जहादी प्रवृत्तीच्या महिला शिक्षकांना शाळेमध्ये ठेवू नये, लहान मुलांच्या मनावर धर्मांतराबाबत शिकवले जाते हा गंभीर प्रकार असून पालकांनी पुढे येऊन अशा प्रवृत्तीच्या लोकांवर गुन्हे दाखल करावे, यांना धडा शिकवण्याचे काम आपण करू हा प्रकार गंभीर असून पोलीस अधीक्षकांनी लक्ष घालावे असे आमदार संग्राम जगताप यांनी सांगितले, यावेळी माजी नगरसेवक प्रकाश भागानगरे, सुरेश बनसोडे, दत्ता खैरे, विशाल पवार, डॉक्टर राहुल मुथा, अनंत शेळके, रमेश गांधी, अमोल देडगावकर, मेहुल शहा, परेश लोढा, दिनेश चोपडा, ओंकार घोलप आदी उपस्थित होते.

निवेदनात पुढे म्हणले आहे की, शहरातील एका खाजगी नामांकित शाळेत ९ वी मध्ये शिकणारी १३ वर्षांची अल्पवयीन मुलीला त्या शाळेतील नूर मॅडम या मुस्लीम महिला शिक्षिकेने विश्वासात घेवून तीला जादू टोण्यासारखा प्रकार करून लव जिहाद या मध्ये अडकवण्याचा प्रकार केलेला समोर आलेला आहे. या शिक्षिकेने मुलीस एक काम सांगितले नंतर दुस–या दिवशी तिला विश्वासात घेवून तिची घ रची माहिती काढली, घरात कोण कोण राहत, घरचा व्यावसाय काय आहे परिस्थिती कशी आहे. आई वडिलांसोबत मुलीचे संबंध कसे आहेत याची सखोल माहिती मिळवली. मुलगी एकुलती एक आहे समजल्यावर दुसऱ्या दिवशी रॅपर नसलेले चॉकलेट तिला खायला दिले. त्यानंतर मुलीला २३ दिवसानंतर उलट्या झाल्या, गुंगी आली आणि त्याच्या दुस–या दिवशीपासून मुलगी मॅडमकडे इस्लामची मजहबनी माहिती घ्यायला लागली, मला नमाज पढायला शिकवा अशी मागणी ती मुलगी त्या शिक्षिकेकडे करायला लागली. यानंतर या नूर मॅडमने मुलीला इंस्टाग्रामचा आयडी ओपन करून दिला एका मुस्तकिन तांबोळी नावाच्या मुस्लीम मुलाशी ओळख करून दिली आणि मुलीच्या परवानगी शिवाय तीचा मोबाईल नंबर त्या मुलाला दिला, तुमचे बहिण भावाचे नाते आहे असे मुलीला सांगून त्यांच्यात नातेसंबंध बनवून दिले.

अशा प्रकारे या व अहिल्यानगर जिल्ह्यातील शाळांमध्ये अशा प्रकारचे गंभीर प्रकार चालू आहेत व अल्पवयीन हिंदू मुलींवर शाळेतील मुस्लीम शिक्षिकेमार्फत अशा प्रकारचे प्रयोग चालू आहेत. आमची सर्व पालकांतर्फे आपणास मागणी आहे की हा अतिशय गंभीर प्रकार असून या बाबत सदर शाळेतील नूर मॅडम व तीला सहकार्य करणाऱ्या इतर शिक्षकांची सखोल चौकशी करण्यात यावी व यामार्फत अजून किती मुलींना या प्रकारामध्ये अडकवलेले आहे तसेच हे करण्यामागे अजून कोण कोणत्या व्यक्तींचा सहभाग आहे व हे रॅकेट उघडकीस आणून यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी निवेदनात करण्यात आली.

# श्रीरामपुरात पाण्याच्या टाकीवरून पडून तरुण ठार

**सार्व मंथन**
**श्रीरामपूर ०५ । प्रतिनिधी**



येथील वार्ड नंबर दोन मधील नगरपालिकेच्या जलकुंभावरून खाली पडल्याने रिजवान रशीद शाह (वय २२, रा. वार्ड नंबर दोन) या तरुणाचा काल (दि.४) दुपारी दुर्दैवी मृत्यू झाला.

वार्ड नंबर दोन वैदू वाडा परिसरामध्ये सदर जल कुंभ असून त्याच्या सर्व वॉल कंपाऊंडच्या भिंती तुटले आहेत. तसेच येथे पालिकेचा कोणताही सुरक्षारक्षक नाही. त्यामुळे परिसरातील अनेक तरुण नेहमी टाकीच्या जिन्यावरून वर जातात तेथे बसतात. रिझवान असाच आजवर जाताना त्याचा तोल गेला व तो वरून खाली पडला व जागीच त्याचा मृत्यू झाल्याचे समजते.

शहर पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन त्याचा मृतदेह कामगार हॉस्पिटल येथे पाठवला. मात्र तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासून त्याला मृत घोषित केले.

सदर पाण्याचा जलकुंभ ज्या ठिकाणी आहे. त्याच्या आसपास सर्वत्र दाट लोकवस्ती आहे. जल कुंभाचे वॉल कंपाऊंडच्या भिंती संपूर्णपणे तुटल्या आहेत. येथे सुरक्षा रक्षक नाही. त्यामुळे सुरक्षेचा मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. रिजवान शाह या तरुणाच्या अकस्मात मृत्यूमुळे हळहळ व्यक्त होत आहे.

# 'मुसा' ठरला आकर्षणाचा केंद्रबिंदू

सार्व मंथन ✍ अहिल्यानगर ०५ । भारतातील सुप्रसिद्ध सारंगखेडा अश्व बाजार चेतक फेस्टिव्हलच्या उद्घाटन सोहळ्यात अहिल्यानगर येथील गुलशन स्टड फार्मचा सर्व गुणसंपन्न आणि देखणा अश्व मुसा हा घोडा प्रमुख आकर्षण ठरला. 'मुसा'ची जवळून पाहणी करून घोड्याच्या देखणेपणाबद्दल आणि त्याच्या गुणवैशिष्ट्यांबद्दल गुलशन उद्योग समूहाचे उद्योजक इम्रान (शेठ) शेख यांच्याशी सविस्तर चर्चा केली.

# मुळा नदीच्या पुलाखाली सहा महिन्यांचे अर्भक मृतावस्थेत

**सार्व मंथन**
**संगमनेर ०५ । प्रतिनिधी**

संगमनेर तालुक्यातील घारगावमध्ये आज (ता.४) सकाळी मुळानदीच्या पुलाखाली अंदाजे चार ते सहा महिन्यांचे अर्भक मृतावस्थेत आढळल्याने संतापाची लाट उसळली. कपाळावर बुक्क्याचा टीळा, हातापायांना काळा धागा व कंबरेला करगूटा वगळता अंगावर कपडा नसलेल्या या बाळाची ओळख पटवण्यासाठी घारगाव पोलिसांनी आवाहन केले आहे.

झुडपात निपचित अवस्थेत बाळ दिसताच नागरिकांनी तत्काळ पोलिसांना कळवले. सहाय्यक निरीक्षक हेमंत थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली पंचनामा करून अर्भकाला ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आले असून दोन दिवस ओळख पटवण्याचे प्रयत्न सुरू राहणार आहेत. त्यानंतर लोणी प्रवरा रुग्णालयात उत्तरीय तपासणी केली जाईल.

निर्वस्त्र अवस्थेत अर्भक फेकून दिल्याने हा प्रकार कौटुंबिक वाद, अनैतिक संबंध किंवा अन्य कारणांमधून घडला असावा, असा प्राथमिक अंदाज व्यक्त होत आहे. या घटनेने घारगावमध्ये संताप व्यक्त होत असून पोलिसांकडून मारेकरी शोधण्याची मागणी जोर धरत आहे.

# सत्यजित कदमांच्या वाढदिवसादिनी देवळालीकर एकदिलाने उभे
### सामाजिक, राजकीय, धार्मिक, कला, क्रीडा क्षेत्रातील मान्यवरांसह सोशल मीडियावरून शुभेच्छांचा वर्षाव

**सार्व मंथन**
**देवळाली प्रवरा ०५ । प्रतिनिधी**

देवळाली प्रवरामध्ये माजी लोकनियुक्त नगराध्यक्ष सत्यजित कदम यांच्या वाढदिवसानिमित्त शहरभर उत्साहाचे आणि जल्लोषाचे वातावरण पाहायला मिळाले. सामाजिक, राजकीय, धार्मिक, कला, क्रीडा आदी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी प्रत्यक्ष भेट देत तसेच सोशल मीडियावरून शुभेच्छांचा वर्षाव करून कदम यांच्यावरील आपुलकी व्यक्त केली.

माजी आमदार चंद्रशेखर कदम यांनी स्वत: भेट देत सत्यजित कदम यांचे अभिष्टचिंतन केले. तसेच प्रिती सत्यजित कदम व शहरातील महिला भगिनींनी पारंपरिक पद्धतीने औक्षण करून वाढदिवस सोहळा अधिक मंगलमय केला.

शहरातील विविध मान्यवरांकडून कदम यांचे सामाजिक योगदान, लोकसहभागातून केलेले उपक्रम व नेतृत्वगुणांचा गौरव करत शुभेच्छांचा सतत वर्षाव होत राहिला.





कार्यक्रमास साई आदर्श मल्टीस्टेटचे चेअरमन शिवाजीराव कपाळे, भाजपा जिल्हा सरचिटणीस अमोल भनगडे, माजी उपनगराध्यक्ष प्रकाश संसारे, धनलक्ष्मी उद्योग समूहाचे अध्यक्ष विष्णुपंत गीते, सोसायटीचे माजी चेअरमन शहाजी कदम, मच्छींद्र कदम, प्रा. सुधाकर कदम, सोपान शेटे, सोपान भांड, आबासाहेब वाळुंज, माजी नगराध्यक्ष गोरक्षनाथ मुसमाडे, मुरलीधर कदम, , अशोक शेटे, माजी नगरसेवक सचिन ढुस, अमोल कदम, भारत शेटे, संतोष चव्हाण, भाजप शहराध्यक्ष अजित चव्हाण, वसंत कदम, अकिल बाबा पटेल, सुधीर टिक्कल, प्रशांत कोठुळे, सचिन शेटे, संदीप कदम, सतीश वने, राजेंद्र चव्हाण, मारुती नालकर, डॉ. भागवत वीर, किशोर गडाख, व्यापारी असोसिएशनचे सतीश वाळुंज, मनोज शिंदे, सचिन घोरपडे, सागर खांदे, सचिन कोठुळे, अभिजीत कदम, शशी खाडे, डॉ. प्रवीण कोठुळे, रामेश्वर तोडमल, कुमार कदम, गणेश मुसमाडे, मनोज भोंगळ, सचिन सरोदे, मोहसीन शेख, हेमंत आंबिलवादे, सुखदेव घुले, शरद खांदे, गोरख धनवटे, गणेश झिने, तुषार शेटे, मेजर पंकज सोंडे, मंगेश ढुस, कल्पेश भालसिंग, ओंकार लांडे, अक्षय गाडेकर आदी मान्यवरांसह सत्यजित कदम फाउंडेशनचे सदस्य व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान शहरातील विविध भागांत अभिष्टचिंतन कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडले. तीन चारी, गडाख वस्ती शाळा, चव्हाण वस्ती दत्त मंदिर, वैष्णवी चौक, समर्थनगर दत्त मंदिर, राहुरी वृंदावन कॉलनी, कराळेवाडी, चेतन कदम वस्ती, आदिनाथ तांबे वस्ती, बिरोबावाडी, शेटेवाडी चौक, बैलगाडी यार्ड राहुरी फॅक्टरी, कानिफनाथ मंदिर, श्रीराम मंदिर अशा अनेक ठिकाणी वाढदिवसाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले. दिवसभर झालेल्या या अभिष्टचिंतन सोहळ्यांमुळे संपूर्ण शहरात उत्साहाची लाट उसळली होती.

सायं. दैनिक **सार्व मंथन** नवी दिशा, नवी आशा

हे पत्रक मुद्रक, मालक, प्रकाशक **अनिल गंगाधर कोळसे** यांनी यांच्या **स्वराज प्रेस अँण्ड प्रिंटींग येथे ५९३, राहुरी बु।, ता. राहुरी, जि. अहमदनगर (महा) येथे छापून कोळसे दुबीचा मळा, व्यंकोबा मंदीर परिसर, राहुरी, ता. राहुरी, जि. अहमदनगर ४१३ ७०५, (महा.)** येथे प्रकाशित केले. संपादक अनिल गंगाधर कोळसे सदर अंकात प्रकाशित झालेल्या लेख बातम्यांच्या मजकूराशी संपादक सहमत असेलच असे नाही. न्यायालयीन वाद–विवाद राहुरी न्याय कक्षेअंतर्गत (खाजगी वितरणासाठी) मुद्रणीय दोष संभवणीय.
RNI No. MAHMAR/2016/72596